IV

<u>मसुदा</u>

<u>क्र. ४/२०१६-१७</u>

गोपनीय

<u>व्यवस्थापन परिषद</u>

# मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची सभा ***मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०१७ रोजीची स्थगित सभा शुक्रवार, दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी सकाळी १०.३०*** वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई -४०० ०३२. येथे सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. संजय व्ही. देशमुख, (कुलगुरू)

२. श्री. सिध्दार्थ खरात (उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

३. डॉ. रोहीदास काळे (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)

४. डॉ. सुभाष महाजन (संचालक, उच्च व तंत्रशिक्षण संचालनालय)

श्री. विजय फ. तायडे, वित्त व लेखा अधिकारी आणि श्री. दिपक वसावे, स्थानापन्न संचालक व परिक्षा व मुल्यमापन हे निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

बाब क्र.७८: " Approval to selection of service provider for implementation of On-Screen Marking System (OMS) of evaluation of answer-sheets from first half of 2017."

ठराव : मा. कुलगुरू यांनी सदर प्रस्ताव सादर करताना On Screen Marking System बाबतची पार्श्वभूमी विषद केली त्यावर सन्माननिय सदस्य डॉ. काळे यांनी विद्यापीठ स्तरावर प्रथमच On Screen Marking System राबवित असल्याने ही पद्धत सर्व परिक्षांसाठी एकदमच लागू करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने काही परिक्षांसाठी ही पद्धती अमंलात आणावी अशी सुचना केली. तसेच इतर सन्माननिय सदस्य श्री. खरात व डॉ. महाजन यांनीही या वर्षी On Screen Marking System नुसार मुल्यमापन करण्याकरीता वेळ कमी असल्याने अशाप्रकारचे काम टप्प्याटप्प्याने करावे असे मत मांडले. त्यावर मा. कुलगुरूंनी सभागृहास माहिती दिली की, "आपण OSM पद्धत विद्यापीठात प्रथमच राबवित नाही आहोत. गेल्या ४ वर्षापासुन अभियांत्रिकीच्या सुमारे १००-११० परिक्षांसाठी विद्यापीठाने OSM पद्धती यशस्वीपणे राबविली

आहे. विद्यापीठाच्या संपूर्ण परिक्षांपैकी २५% पेक्षा जास्त परिक्षा गेली आठ सत्र OSM पद्धतीने यशस्वीपणे राबविण्यात आल्या आहेत. याबरोबर सर्व परिक्षांमध्ये OSM पद्धतीचा वापर करण्यासाठी विद्यापीठाने आवश्यक पायाभुत सुविधा कालबदध पद्धतीने विकसित केल्या आहेत." पुढे याबाबत अधिक माहिती देण्यासाठी सभागृहाच्या परवानगीने तंत्रशिक्षण या विद्याशाखेचे समन्वयक डॉ. उकरंडे आणि मेरीट ट्रॅक या कंपनीचे श्री. नागेंद्र यांना आमंत्रित केले. या दोघांनीही On Screen Marking System बाबत सविस्तर माहिती सभागृहास विषद केली. सादरीकरणावर सविस्तर विचारविमर्श झाला मा. कुलगरुंनी याविषयी सभासदांच्या सर्व शंकांचे निरसन केले. चर्चेअंती २०१७ च्या प्रथम सत्रापासुन सर्व परिक्षांसाठी OSM पद्धती लागु करण्याचा ठराव एकमताने संमत झाला.

उपरोक्त बाबींच्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की, दिनांक २७ एप्रिल, २०१७ रोजी झालेल्या खरेदी समितीमधील बाब क्र. ७ अन्वये पारित करण्यात आलेल्या ठरावानुसार विद्यापीठाच्या सर्व परिक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन, पुर्नमुल्याकंनांचे काम On Screen Marking पद्धतीनुसार करण्याकरिता मेरीट ट्रॅक या कंपनीला देण्यात यावे व हे काम प्रथम सत्र २०१७ पासून पुढील ३ वर्षांकरीता म्हणजेच व्दितीय सत्र २०१९ पर्यंत त्याच दरात करण्यात यावे व प्रत्येक सत्रानंतर या कामगिरीचा आढावा घेण्यात यावा.

पुढे असेही ठरविण्यात आले की, एका उत्तरपत्रिकेच्या मागे मुल्यांकनासाठी रू. २३.५०/- (कर वगळून) हे मेरीट ट्रॅक या कंपनीस देण्यात यावे व रू.३.५०/- प्रत्येक महाविद्यालयाला उत्तरपत्रिका मुल्यांकनामागे होणारा अनुशांगिक खर्च म्हणून देण्यात यावे.

उपकुलसचिव
(का.प्रा.वि.)

कुलसचिव

कुलगुरू